पशुआरोग्य

# जनावरांमधील अस्थिभंग; प्रकार आणि प्रथमोपचार

डॉ. मयूर काटे
डॉ. गिरीश उपाध्ये
डॉ. गौरी फिसके
पशु शल्यचिकित्साशास्त्र विभाग,
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर



जनावरांच्या शरीरावर झालेल्या आघाताची तीव्रता लक्षात घेऊन उपचारांची पार्श्वभूमी तयार करावी. रक्तस्त्राव होत असल्यास तो थांबवावा. जखम स्वच्छ करुन त्यात असलेली घाण काढून घ्यावी, वेदनाशामक औषधांचा वापर करुन वेदना कमी करावी. त्यानंतर अस्थिभंगामुळे मोडलेल्या अस्थींना सरळ एका रेषेत आणावे व अस्थिभंगाची हालचाल नियंत्रित करावी. तसेच मोडलेल्या हाडाचे टोक जुळवून त्या भागावर बांबूच्या कामट्या वापरुन बॅन्डेज बांधावे व त्यावर प्लॅस्टर लावावे.

**ज**नावरांच्या शरीरातील कोणत्याही हाडाच्या सलगतेमध्ये किंवा संधीमध्ये आघात अथवा जोराचा मार लागल्यामुळे जो भंग होतो त्याला अस्थिभंग किंवा फ्रॅक्चर म्हणतात. भंगलेल्या हाडाचे स्वरुप व त्यामुळे झालेली जखम यावरुन अस्थिभंगाचे विविध प्रकार ओळखले जातात.

१) त्वचेस इजा न होता झालेल्या अस्थिभंगास साधा अस्थिभंग असे म्हणतात.

२) संमिश्र अस्थिभंग म्हणजे त्वचेस इजा होऊन हाड बाहेर येते व तेथे जखम होते.

३) बहु-अस्थिभंग म्हणजे हाडाचा चुरा होणे. यामध्ये हाडाचे अनेक तुकडे होतात.

**निदान :** अस्थिभंग निदानाचे मुख्य साधन म्हणजे 'क्ष-किरण' तपासणी आहे. अशी व्यवस्था नसल्यास अस्थिभंगाची लक्षणे अशी ओळखावी- जखम, अस्थिभंगाची जागा गरम किंवा लाल होणे. या ठिकाणी वेदना होतात व वास येतो आणि यामुळे त्या भागाची हालचाल कमी होऊन क्रिया बंद होते. त्या भागातील वेदना कमी करणे जरुरीचे आहे. जखमेच्या भागाला हाताने दाब दिला असता पूर्ण अस्थिभंग असेल तर त्या जागेवरुन कर-कर असा आवाज होतो.

**उपचारांची पद्धत**

१) अस्थिभंगाच्या जागी जखम असेल किंवा त्या जागेमधून रक्तस्त्राव होत असल्यास ती जागा स्वच्छ करुन कापडी पट्टी बांधावी.

२) हाड योग्य प्रकारे बसवूनच हाडाची जुळवणी करावी. हाडाची जुळवणी एकसंध होऊन, हाड योग्य बसल्याची खात्री झाल्यावर त्या ठिकाणी पट्टी बांधावी.





२) **हालचालीवर नियंत्रण :** जुळवलेल्या हाडाची किंवा भागाची हालचाल होता कामा नये. तो भाग स्थिर राहील याची काळजी घ्यावी. ज्यामुळे तंतुमय व अस्थिजन्य पेशींचा गोळा बनून हाड जुळण्यास मदत होईल.

३) **सुयोग्य रक्तपुरवठा :** हाडाची जुळवणी करताना संबंधित भागात सुयोग्य रक्तपुरवठा सतत होत राहील याची खबरदारी घेतली पाहिजे. संबंधित भागावर अवास्तव दाब पडता कामा नये. तसेच तेथे घट्ट पट्टी बांधू नये; नाही तर सदर भागावर जास्त दाब दिला तर त्यामध्ये रक्तपुरवठा योग्य प्रमाणात होत नाही व हाडाची जुळवणी बरोबर होत नाही. परिणामी त्या भागामध्ये पाणी होऊन तो भाग किंवा त्या भागातील मांस सडते. हे सर्व टाळण्यासाठी रक्तपुरवठा सुरळीतपणे चालू राहील याची काळजी घेतली पाहिजे.

४) **क्षार व जीवनसत्त्वांचा पुरवठा :** शरीरास क्षार व जीवनसत्त्वांचा योग्य पुरवठा होणे गरजेचे आहे. जनावरे दुबळी असतील तर त्यांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने भरपूर क्षार व जीवनसत्त्वांची इंजेक्शने द्यावी, ज्यामध्ये कॅल्शियम, फॉस्फरस व जीवनसत्व 'ड' इत्यादींचा समावेश असावा. यामुळे हाडे बळकट होण्यास मदत होते.

**हे लक्षात ठेवा**

जनावरांच्या शरीरावर झालेल्या आघाताची तीव्रता लक्षात घेऊन उपचारांची पार्श्वभूमी तयार करावी. रक्तस्त्राव होत असल्यास तो थांबवावा. जखम स्वच्छ करुन त्यात असलेली घाण काढून घ्यावी, वेदनाशामक औषधांचा वापर करुन वेदना कमी करावी. त्यानंतर अस्थिभंगामुळे मोडलेल्या अस्थींना सरळ एका रेषेत आणावे व अस्थिभंगाची हालचाल नियंत्रित करावी. तसेच मोडलेल्या हाडाचे टोक जुळवून त्या भागावर बांबूच्या कामट्या वापरुन बॅन्डेज बांधावे व त्यावर प्लॅस्टर लावावे. प्लॅस्टर भिजणार व फाटणार नाही याची काळजी घ्यावी.

अस्थिभंगाच्या जागेवर झालेल्या जखमेत रोगजंतूंचा संसर्ग टाळण्यासाठी प्रतिजैविकांचा वापर करावा.

**जनावरांना होणाऱ्या जखमा व त्यावरील उपचार**

जनावरांना होणाऱ्या जखमा साधारणत: तीक्ष्ण तार, खिळे, काटेरी कुंपण, मार लागणे, आघात होणे, भाजणे इत्यादी कारणांमुळे होतात. पशुपालकांनी जनावरांना होणाऱ्या जखमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे जनावरांना त्रास होतो. ज्यामुळे जनावरांची उत्पादनक्षमता कमी होऊन पशुपालकांचे आर्थिक नुकसान होते. काही प्रसंगी जखमांमध्ये जिवाणूंचा संसर्ग होऊन जनावर दगावू शकते.

जखमा मुख्यत्त्वेकरुन खालील प्रकारात मोडतात.

अ) बंद जखमा : या प्रकारच्या जखमांत त्वचा दुभंगत नाही परंतु त्याखालील मांसपेशींना इजा होते. उदा. मुका मार लागणे, खरचटणे, रक्तार्बुद इत्यादी.

ब) विदारित जखमा : या प्रकारामध्ये त्वचा दुभंगते. काटेरी तारांच्या कुंपणामुळे अशा जखमा होतात. या जखमेचा काप सरळ रेषेत किंवा ओबडधोबड असतो.



क) अंतर्वेधी जखम : अशा जखमा खिळे किंवा टोकदार अवजाराने होतात. या जखमांची खोली जास्त नसते, त्यामुळे जंतुसंसर्ग खोलपर्यंत होऊ शकत नाही.

ड) वेधी जखम : अशा जखमा साधारणत: जनावराच्या शिंगामार्फत किंवा साखळी इत्यादी टोकदार वस्तूने होतात. या जखमांची खोली जास्त असते व वेदना शरीरातील पोकळी- जसे की, पोट, छाती, घसा इत्यादीपर्यंत पोहोचते.

इ) संदुवित जखम : अशा जखमेत जंतुसंसर्ग जास्त प्रमाणात होऊन जखम चिघळते आणि जनावरांच्या त्वचेमध्ये खोलवर जाऊन जखमेत किडे पडतात.

फ) भाजण्याची जखम : अति उष्णतेमुळे, आगीत जळल्यामुळे किंवा गरम पाण्याचा वापर करताना जनावराच्या शरीराचे बाह्य आवरण भाजते.

ग) कीटक आणि प्राणिदंश : अशा जखमा कीटक



आणि सरपटणारे प्राणी चावल्यामुळे होतात. प्रामुख्याने शरीराच्या खालच्या भागावर, तोंडावर व पायावर आढळून येतात.

**उपचार**

जखमा झालेल्या जागेचे प्रथम निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे असते. असे न केल्यास जखमेत जंतूंचा प्रादुर्भाव होऊन ती जखम चिघळते व जखम बरी होण्यास वेळ लागतो. म्हणून जखमेच्या सभोवतालचे केस कापून घ्यावे व निर्जंतुकीकरणासाठी सॅव्हलॉन, स्पिरिट, टिंक्चर आयोडिन अशी औषधे वापरुन ती जागा स्वच्छ करावी.

जखमांत पू झाल्यास हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर करुन ती जागा धुवावी व आयोडिन वापरुन निर्जंतुकीकरण करावे. जखमांवर जंतुघ्न मलम लावल्यास जखमा लवकर भरुन निघतात. तसेच जंतुनाशकाचा उपयोग करणे हितावह ठरते.

सर्पदंश झालेल्या वरच्या भागावर दोरी अथवा रबरी नळी घट्ट बांधावी तसेच पशुवैद्यकांकडून तपासणी करुन ॲन्टीस्नेक व्हेनम तात्काळ द्यावे. जनावर दगावणार नाही याची काळजी घ्यावी. श्वानदंश झाल्यास दंशाच्या ठिकाणी झालेल्या जखमा तात्काळ धुवून पशुवैद्यकाच्या सल्ल्याने श्वानदंशाकरिता लसीकरण करुन घ्यावे. ■